प्रधान लेखाशीर्ष २२३५- स्वातंत्र्य सैनिक व त्यांचेवर अवलंबितांना निवृत्तीवेतन या योजनांतर्गत सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात एप्रिल २०१८ ते डिसेंबर, २०१८ करिता अर्थसंकल्पिय अनुदान (B.E.) वितरण.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बियुडी १४१८/प्र.क्र.५३/२०१८/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २६ एप्रिल, २०१८.

<u>वाचा</u> :- शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.७०/ अर्थ-३, दि. ४ एप्रिल, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या अर्थसंकल्पावर मागणीनिहाय चर्चा होऊन विधान मंडळाने महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१८ मंजूर केलेले आहे. सदर विधेयक महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २७ मार्च, २०१८ मध्ये अधिनियम क्रमांक २२ (बावीस) म्हणून प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०१८-१९चे नऊमाही अनुदान (एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८ पर्यंत) वितरणासाठी प्रशासकीय विभागाच्या संबंधित सह/उपसचिवांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या कार्यासनाशी संबंधित प्रधानलेखाशीर्ष २२३५, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्ती, इत्यादींना निवृत्तीवेतन, (२२३५ ००१५), या योजनेसाठीचे सन २०१८-१९ करिता माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१८ साठीचे नऊमाही अनुदान संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रात वित्तीय वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज या स्तंभाखाली दर्शविलेली प्रधानलेखाशीर्ष २२३५, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्ती, इत्यादींना निवृत्तीवेतन, (२२३५ ००१५), या योजनेची तरतूद **रु. ७२,७७,१५,०००/- (रुपये बहात्तर कोटी सत्याहत्तर लाख पंधरा हजार फक्त)** इतकी असून या रकमेपैकी **७०%** म्हणजेच **रु. ५०,९४,००,५००/- (रुपये पन्नास कोटी चौऱ्यान्नव लाख पाचशे फक्त)** रक्कम संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यांच्या समोर दर्शविलेल्या प्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

२. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना वितरीत केलेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, तसेच शासन मान्यता प्राप्त बाबीसाठीच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच मासिक निधी वितरण प्रणालीनुसार अनुदान खर्च करण्यात यावे.

३. जिल्हाधिकाऱ्यांना वितरीत केलेल्या निधीतून खर्च केलेल्या अनुदानाच्या रकमांचा ताळमेळ महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर यांचेकडे विहित कालावधीत करुन खर्चमेळाचा मासिक अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा. याप्रकरणी शासन परिपत्रक क्र. खर्चमेळ २०११/प्र.क्र.१३९/२०११/स्वासैक-१, दिनांक १६/८/२०११ नुसार कार्यवाही करावी.

४. याप्रित्यर्थचा चालू आर्थिक वर्षातील खर्च मागणी क्र.ए-५, २२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६०- इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०२- सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन, (००) (०१) स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेतन (२२३५००१५)
दत्तमत या लेंखाशीर्षाखालील सन २०१८-१९ या वित्तिय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०४२६१५५५२६३२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arun Vasnt Shinde

Digitally signed by Arun Vasnt Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=213d983c0c3b73519fa14c37396dd0b3cf8f28e16bc2fb6620a5c4fdac6e7284, serialNumber=672d36cc7468aa812e66dbb4704ffeb120dd58831284824f4fbec2a6f6602199, cn=Arun Vasnt Shinde
Date: 2018.04.26 15:59:13 +05'30'

(अरूण व. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री (सा.प्र.)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
५) महालेखापाल(लेखापरिक्षा),महाराष्ट्र-१,मुबई/महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र-२,नागपूर,
६) उ.स. (स्वासैकक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व जिल्हाधिकारी,
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२) सामान्य प्रशासन विभाग, का.२५, मंत्रालय, मुंबई
१३) क.अ. वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई
१४) क.अ. (स्वासैक २/३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

राज्यशासन मान्यताप्राप्त स्वातंत्र्यसैनिकांसाठी निवृत्तीवेतन व अन्य सवलती

शासन निर्णय, क्रमांक: बियुडी १४१८/प्र.क्र.५३/ स्वासैक-१, दि. २६ एप्रिल,२०१८ सोबतचे

विवरणपत्र

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	वित्तिय वर्ष २०१८-१९चे अर्थसंकल्पिय अंदाज (रु.)	सन २०१८-१९ (एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८) अनुदान वितरण (रु.)
(१)	(२)	(३)	(४)
१	मुंबई शहर	१६३१४०००	११४१९८००
२	मुंबई उपनगर	३०९४५६००	२१६६१९२०
३	ठाणे	११६२८००	८१३९६०
४	पालघर	२८२३६००	१९७६५२०
५	रायगड	८७२७६००	६१०९३२०
६	रत्नागिरी	१८७५६००	१३१२९२०
७	सिंधुदुर्ग	११३५२००	७९४६४०
८	नाशिक	११६४१२००	८१४८८४०
९	जळगाव	२४९०८४००	१७४३५८८०
१०	धुळे	१०५०४९६८	७३५३४७७
११	नंदुरबार	६३४८००	४४४३६०
१२	अहमदनगर	१९९०२०००	१३९३१४००
१३	पुणे	३०७८१२००	२१५४६८४०
१४	सातारा	३०२७४८००	२११९२३६०
१५	सांगली	४७२९३२००	३३१०५२४०
१६	सोलापूर	४२९७५६००	३००८२९२०
१७	कोल्हापूर	२२५०००००	१५७५००००
१८	औरंगाबाद	२९६०५२००	२०७२३६४०
१९	जालना	३२६३७६००	२२८४६३२०
२०	बीड	६९४९०८००	४८६४३५६०
२१	नांदेड	६०३७६८००	४२२६३७६०
२२	हिंगोली	१५०८०४००	१०५५६२८०
२३	परभणी	१०८६८४००	७६०७८८०
२४	लातूर	३७४८५६००	२६२३९९२०
२५	उस्मानाबाद	६९०७६८००	४८३५३७६०
२६	अमरावती	७५९१२००	५३१३८४०
२७	बुलढाणा	३८५८०००	२७००६००
२८	यवतमाळ	२५६८०००	१७९७६००
२९	अकोला	८८८००००	६२१६०००
३०	वाशिम	१८२५२००	१२७७६४०
३१	नागपूर	४७५४६४००	३३२८२४८०
३२	वर्धा	११७७६८००	८२४३७६०
३३	भंडारा	३९१५६००	२७४०९२०
३४	गोंदिया	२२०४४००	१५४३०८०
३५	चंद्रपूर	२४७०८००	१७२९५६०
३६	गडचिरोली	१४२८००	१०००००
	एकूण	**७२,७७,१४,८००**	**५०,९४,००,५००**